दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

**आजचे पंचांग**

रविवार दि. १० मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, अष्टमी दुपारी ३-०७ पर्यंत नंतर नवमी तिथी,
दिवस नक्षत्र– धनिष्ठा रात्री १२-५० पर्यंत नंतर शततारा, चंद्र रास- मकर दुपारी १२-१३ पर्यंत नंतर कुंभ, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

**दैनंदिन वापराच्या वस्तू महागणार**

**मुंबई**: साबण, बिस्किटे, खाद्यतेल, शॅम्पू यांसारख्या दैनंदिन वापराच्या वस्तू लवकरच महाग होण्याची शक्यता आहे. वाढत्या कच्च्या मालाच्या किमती, पॅकेजिंग खर्चातील वाढ आणि पश्चिम आशियातील तणावामुळे एफएमसीजी कंपन्यांवर खर्चाचा दबाव वाढला असून, डाबर इंडिया, हिंदुस्तान युनिलिव्हर, नेस्ले इंडिया, मॅरिको, ब्रिटानिया आणि आयटीसीसारख्या कंपन्या उत्पादनांच्या किमती वाढवण्याच्या तयारीत आहेत. घरगुती खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. १० मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### भारतीय खलाशाचा आगीत मृत्यू

**नवी दिल्ली** : होर्मुझच्या सामुद्रधुनीजवळ जहाजाला लागलेल्या आगीत एका भारतीय खलाशाचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. शुक्रवारी झालेल्या या घटनेनंतर इतर सतरा भारतीय क्रू मेंबर्सची सुटका करण्यात आली असून आगीचे नेमके कारण अद्याप समजले जात नाही, असे त्यांनी सांगितले. सूत्रांनी सांगितले की, या भागात जाणाऱ्या एका जहाजाने क्रू मेंबर्सची सुटका केली.

### भारताच्या सन्मानासाठी मोदी-योगी सरकार

**रामपूर (उत्तर प्रदेश)** : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि योगी यांचे सरकार सर्वसमावेशक सबलीकरणाची हमी आहे, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री मुख्तार अब्बास नक्वी यांनी शनिवारी केले. भारतीय जनता पक्षाच्या दोन दिवसीय 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाभियान'च्या समारोप सत्राला संबोधित करताना नक्वी म्हणाले की, 'सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि घटनात्मक धर्मनिरपेक्षता' या पक्षाच्या वचनबद्धतेमुळे ते सुशासन आणि सर्वसमावेशक विकासाचा जागतिक ब्रँड म्हणून स्थापित झाले आहेत.

### माकप कार्यकर्त्यांवर क्रॉस व्होटिंगचा आरोप

**कोट्टायम** : विधानसभा निवडणुकीदरम्यान माकपच्या कार्यकर्त्यांनी क्रॉस व्होटिंग केल्याचा आरोप केरळ काँग्रेस (एम)चे अध्यक्ष जोस के. मणी यांनी केला. केरळ कॉंग्रेसच्या पराभवाच्या कारणांचे मूल्यांकन करण्यासाठी झालेल्या बैठकीनंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते, केरळ कॉंग्रेस हा माकपच्या नेतृत्वाखालील एलडीएफचा एक घटक आहे, जो विधानसभा निवडणुकीत पराभूत झाला.

### सुवेंदू अधिकारी यांनी घेतली मुख्यमंत्रिपदाची शपथ

# पश्चिम बंगालमध्ये भाजप सरकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये प्रथमच भाजपचे सरकार सत्तेवर आले असून भाजप विधिमंडळ पक्षाचे नेते सुवेंदू अधिकारी यांनी शनिवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. कोलकात्यातील ब्रिगेड परेड ग्राउंडवर झालेल्या भव्य सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवी यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.



या सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री, एनडीएशासित राज्यांचे मुख्यमंत्री तसेच भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. भाजप समर्थकांच्या मोठ्या गर्दीत आणि जयघोषात हा शपथविधी पार पडला. शपथविधीपूर्वी सुवेंदू अधिकारी यांनी हा दिवस "संस्थापकांच्या स्वप्नपूर्तीचा क्षण" असल्याचे म्हटले. "पश्चिम बंगालसाठी ही ऐतिहासिक पहाट आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच राज्यात भाजपचे सरकार सत्तेवर आले असून विकास, शांतता आणि समृद्धीच्या दुहेरी इंजिन युगाची सुरुवात झाली आहे. 'सोनार बांगला'चे स्वप्न आता प्रत्यक्षात उतरणार आहे," असे अधिकारी यांनी सांगितले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठकीत सुवेंदू अधिकारी यांच्या नावाची मुख्यमंत्रीपदासाठी घोषणा केली होती. त्यानंतर त्यांच्या शपथविधीचा मार्ग मोकळा झाला.

शपथविधी सोहळ्यासाठी उत्तर बंगाल, झारखंडसह विविध राज्यांतून तसेच परदेशातूनही भाजप समर्थक कोलकात्यात दाखल झाले होते. सकाळपासूनच शहरातील विविध भागांत भाजपचे झेंडे आणि भगवे बॅनर घेऊन समर्थकांनी गर्दी केली होती. "पश्चिम बंगालला तृणमूल काँग्रेसच्या राजवटीतून मुक्त होताना पाहण्यासाठी आम्ही आलो आहोत," अशी प्रतिक्रिया झारखंडहून आलेल्या एका समर्थकाने दिली. कॅनडाहून आलेल्या एका व्यक्तीनेही हा ऐतिहासिक क्षण प्रत्यक्ष पाहण्यासाठी कोलकात्यात आल्याचे सांगितले. ब्रिगेड परेड ग्राउंडवर सांस्कृतिक कार्यक्रम, भक्तिगीते आणि पारंपरिक नृत्य सादरीकरणामुळे उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. छोऊ नृत्य आणि आदिवासी कलाप्रकारांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. मुख्य मंचावर पश्चिम बंगालच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविण्यात आले. दक्षिणेश्वर मंदिर, देवी दुर्गा आणि बंगालच्या पारंपरिक प्रतिमांचे चित्रण मंचाच्या सजावटीत करण्यात आले होते. समर्थक ढोल-ताशांच्या गजरात नाचत कार्यक्रमस्थळी दाखल होत होते. अनेकांनी या शपथविधीला "राजकीय परिवर्तनाचा उत्सव" असे संबोधले. कार्यक्रमस्थळी समर्थकांना 'झालमुरी'चे वाटपही करण्यात आले. प्रचारादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारग्राममधील एका दुकानात 'झालमुरी' खाल्ल्यानंतर हा बंगाली पदार्थ चर्चेत आला होता.

# सुवेंदू अधिकारी यांची तातडीची बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुवेंदू अधिकारी यांनी तातडीने वरिष्ठ प्रशासकीय आणि पोलिस अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा आढावा घेतला. नव्या सरकारच्या कामकाजाला वेग देण्याच्या दृष्टीने ही पहिली महत्त्वाची बैठक मानली जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्य सचिव दुष्यंत नरियाला, पोलिस महासंचालक सिद्धनाथ गुप्ता, कोलकाता पोलिस आयुक्त अजय नंद तसेच इतर वरिष्ठ नागरी आणि पोलिस अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत राज्यातील सध्याच्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. निवडणुकीनंतर राज्यातील काही भागांत तणावाचे वातावरण निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सतर्क राहावे, असे निर्देश मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी दिल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय, मागील तृणमूल काँग्रेस सरकारने सुरू केलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीचीही त्यांनी माहिती घेतली. योजनांचा लाभ नागरिकांना पूर्ववत मिळत राहावा आणि कोणत्याही योजनेत अडथळा निर्माण होऊ नये, याची काळजी घेण्याचे निर्देश त्यांनी मुख्य सचिवांना दिले.

दरम्यान, राज्य सचिवालय म्हणून विकसित करण्यात येत असलेल्या रायटर्स बिल्डिंगमधील सुरू असलेल्या नूतनीकरणाच्या कामाचाही त्यांनी आढावा घेतला. कामाची गती आणि प्रगतीबाबत माहिती घेत आवश्यक त्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे समजते.

# गुणरत्न सदावर्ते यांच्या ताफ्यावर मनसैनिकांचा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जालना** : ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या ताफ्यावर शनिवारी जालन्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला. मनसैनिकांनी त्यांच्या गाडीवर शाईफेक करत सुपाऱ्याही भिरकावल्याने परिसरात मोठा गोंधळ उडाला. या घटनेमुळे जालन्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.

गुणरत्न सदावर्ते हे धनगर समाजाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि उपोषणकर्त्यांची भेट घेण्यासाठी जालन्यात आले होते. समृद्धी महामार्गावरून शहरात प्रवेश करत असताना काकडे पेट्रोल पंपाजवळ दबा धरून बसलेल्या मनसे कार्यकर्त्यांनी त्यांचा ताफा अडवला. यावेळी कार्यकर्त्यांनी "राज ठाकरे झिंदाबाद"च्या घोषणा देत सदावर्ते यांच्या गाडीवर काळी शाई फेकली. त्यानंतर त्यांच्या दिशेने सुपाऱ्याही फेकण्यात आल्या. राजकीय भाषेत वापरल्या जाणाऱ्या "सुपारी" या शब्दावरून उपरोधिक स्वरूपात हा प्रकार करण्यात आल्याची चर्चा आहे.

गेल्या काही दिवसांपासून गुणरत्न सदावर्ते आणि मनसे यांच्यात मराठी सक्तीच्या मुद्द्यावरून वाद सुरू आहे. मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर मराठी भाषेची सक्ती करण्यास सदावर्ते यांनी विरोध दर्शवला होता. तसेच त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर टीकाही केली होती. त्याचाच निषेध म्हणून हा हल्ला करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

### एनसीआरबी अहवालात धक्कादायक वास्तव

# रेल्वे प्रवासात महाराष्ट्र सर्वाधिक असुरक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : रेल्वेने दिल्ली, उत्तर प्रदेश किंवा बिहारकडे प्रवास करताना सावधगिरी बाळगणारे महाराष्ट्रातील प्रवासी प्रत्यक्षात स्वतःच्याच राज्यात सर्वाधिक असुरक्षित असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो (एनसीआरबी) च्या २०२४ च्या अहवालानुसार, रेल्वे प्रवासादरम्यान घडणाऱ्या गुन्ह्यांच्या बाबतीत महाराष्ट्र देशात अव्वल ठरला आहे.



राज्य रेल्वे पोलीस (जीआरपी) आणि रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) यांनी नोंदवलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील रेल्वे मार्गांवर मालमत्ता चोरी, जबरी चोरी आणि दरोड्यांच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. देशभरात २०२४ मध्ये जीआरपीकडे एकूण ८३ हजार ६९९ गुन्ह्यांची नोंद झाली. त्यापैकी तब्बल २० हजार ५१९ गुन्हे महाराष्ट्रात नोंदवले गेले आहेत.

विशेष म्हणजे, देशातील एकूण ५९ हजार ५२१ मालमत्ता चोरीच्या गुन्ह्यांपैकी १९ हजार ७१४ गुन्हे केवळ महाराष्ट्रातील रेल्वे मार्गांवर घडल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे रेल्वे प्रवासातील सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

महिला आणि बालकांच्या सुरक्षेचाही प्रश्न गंभीर बनला आहे. अहवालानुसार, महाराष्ट्रात रेल्वे प्रवासादरम्यान बलात्काराच्या ६ आणि लैंगिक अत्याचाराच्या ४५ घटना नोंदवण्यात आल्या आहेत. महिला आणि बालकांवरील अत्याचाराचे एकूण १४६ गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय, हत्येसारख्या गंभीर स्वरूपाच्या ११ घटनांचीही नोंद झाली आहे.

रेल्वे पोलिसांच्या माहितीनुसार, मुंबई उपनगरीय लोकल सेवेतील प्रचंड गर्दी ही गुन्हेगारांसाठी पोषक ठरत आहे. दररोज सुमारे ८० लाख प्रवाशांची वर्दळ आणि ४०० हून अधिक लांब पल्ल्याच्या गाड्यांमुळे चोरट्यांना संधी मिळते. झोपलेल्या प्रवाशांचे मोबाईल आणि पाकिटे चोरी करणे, महिलांची छेडछाड, गर्दीचा फायदा घेऊन अपहरणासारखे प्रकार घडत असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. प्रवासादरम्यान मौल्यवान वस्तूंची काळजी घेणे, अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवणे आणि संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित जीआरपी किंवा आरपीएफ हेल्पलाईनशी संपर्क साधण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

### २१ ते २८ मे दरम्यान पहिल्या फेरीतील प्रवेश प्रक्रिया

# राज्यात अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : दहावीचा निकाल जाहीर होताच माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात केली असून शून्य फेरी आणि पहिल्या फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार ८ मे ते २० मेदरम्यान शून्य फेरी, तर २१ मे ते २८ मेदरम्यान पहिल्या फेरीतील प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी ही माहिती दिली.

राज्यात अकरावीसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून आतापर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा पहिला भाग भरला आहे. विद्यार्थी ११ मेपासून अर्जाचा पहिला आणि दुसरा भाग भरू शकणार आहेत. दहावी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना केवळ ऑनलाइन पद्धतीनेच प्रवेश दिला जाणार असल्याने विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ११ ते १३ मेदरम्यान विद्यार्थ्यांना अर्जाचा पहिला व दुसरा भाग भरता येणार आहे. तसेच व्यवस्थापन, अल्पसंख्याक आणि इन-हाऊस कोट्यांसंदर्भातील माहितीही याच कालावधीत भरता येईल. विद्यार्थ्यांना किमान एक आणि कमाल दहा कनिष्ठ महाविद्यालयांची पसंती नोंदवावी लागणार आहे. १४ आणि १५ मे रोजी तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. त्यावर १६ मे रोजी हरकती नोंदविण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्यानंतर २० मे रोजी पहिल्या फेरीसाठी रिक्त जागांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी सांगितले की, यंदा निकाल लवकर लागल्यामुळे प्रवेश प्रक्रियाही वेळेत सुरू करण्यात आली आहे. अकरावीचे वर्ग १ जुलैपासून नियमित सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दरवर्षी अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया अनेक फेऱ्यांमुळे लांबत असल्याची टीका होत असते. यावर प्रतिक्रिया देताना सिंह म्हणाले की, "सुमारे ९० टक्के विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये पूर्ण होतात. मात्र काही विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नसल्याने अतिरिक्त फेऱ्या घ्याव्या लागतात. ग्रामीण भागातील तांत्रिक अडचणींमुळेही प्रक्रिया विलंबित होते."

### अधिकार नसताना सुनावणी घेतली

**पुणे** : बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन आणि मावेजा वाटपातील कोट्यवधी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी नुकतेच गजाआड झालेले तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यासमोरील कायदेशीर अडचणी आता आणखी वाढल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात त्यांना ५० हजार रुपयांचा दंड सुनावला आहे. धाराशिव येथे अपर जिल्हाधिकारी या पदावर कार्यरत असताना, कोणताही अधिकार दिलेला नसताना त्यांनी एका प्रकरणाची सुनावणी घेऊन चुकीचा निर्णय दिला. ज्याबद्दल न्यायालयाने ही कठोर कारवाई केली आहे.

# धर्मांतरण प्रकरणात निदा खान निर्दोष

### एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर** : नाशिक धर्मांतरण प्रकरण हे द्वेषातून प्रेरित असल्याचा आरोप करत एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी आरोपी निदा खान हिची बाजू घेतली आहे. "माध्यमांकडून तिची मिडिया ट्रायल सुरू असून केवळ आरोपांच्या आधारे तिला दोषी ठरवले जात आहे. मात्र, न्यायालयावर आमचा पूर्ण विश्वास आहे आणि न्यायालय तिला निर्दोष ठरवेल," असे ओवेसी यांनी म्हटले. शनिवारी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी नाशिक धर्मांतरण प्रकरणातील तपास आणि कारवाईवर प्रश्न उपस्थित केले.

ओवेसी म्हणाले, "या प्रकरणात सत्ताधारी पक्षाच्या नेत्याने तक्रार दाखल केली आहे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीनेही यासंदर्भात निवेदन जारी केले आहे. संबंधित मुलगी एचआर विभागात कार्यरत नव्हती. तिची बदली झाली होती आणि त्या कंपनीशी तिचा थेट संबंधही उरलेला नव्हता." या प्रकरणात आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल करण्यात आल्याचे सांगताना त्यांनी धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपावरही टीका केली. "न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना आधीच निकाल लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. माध्यमांमध्ये मिडिया ट्रायल सुरू आहे," असे ते म्हणाले.

निदा खानच्या घरातून बुरखा, नकाब आणि धार्मिक पुस्तक जप्त केल्याचा उल्लेख एफआयआरमध्ये असल्याचे सांगत ओवेसी यांनी प्रश्न उपस्थित केला. "घरात बुरखा किंवा धार्मिक पुस्तक सापडणे हा गुन्हा कधीपासून ठरला?" असा सवाल त्यांनी केला. यावेळी त्यांनी दिल्ली आणि अलाहाबादमधील काही जुन्या प्रकरणांचाही उल्लेख केला.

### भारताच्या सामरिक क्षमतेत मोठी वाढ

# प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारताने 'मल्टिपल इंडिपेंडेंटली टार्गेटेड री-एंट्री व्हेईकल' (एमआयआरव्ही) तंत्रज्ञानाने सज्ज प्रगत 'अग्नी' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केल्याची घोषणा शनिवारी करण्यात आली. या चाचणीमुळे भारताच्या सामरिक आणि आण्विक प्रतिरोधक क्षमतेत मोठी वाढ झाल्याचे मानले जात आहे. ओडिशातील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम बेटावरून शुक्रवारी या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) आणि स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड (एसएफसी) यांच्या संयुक्त



प्रयत्नांतून ही चाचणी पार पडली. क्षेपणास्त्रातील विविध पेलोडनी हिंद महासागर क्षेत्रातील वेगवेगळ्या लक्ष्यांवर अचूक प्रहार केल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. चाचणीदरम्यान जमिनीवरील तसेच समुद्रावरील ट्रॅकिंग स्टेशन, रडार आणि जहाज-आधारित यंत्रणांद्वारे संपूर्ण मोहिमेवर बारकाईने नजर ठेवण्यात आली. सर्व उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण झाल्याची पुष्टी उड्डाण डेटातून करण्यात आली आहे.

तज्ज्ञांच्या मते, ही चाचणी अत्याधुनिक अग्नी-५ किंवा त्याच्या नव्या पिढीतील प्रणालीची असू शकते. यात एमआयआरव्हीसोबतच हायपरसॉनिक ग्लाइड व्हेईकलसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचाही समावेश असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एमआयआरव्ही तंत्रज्ञानामुळे एकाच क्षेपणास्त्रातून अनेक वॉरहेड प्रक्षेपित करता येतात. प्रत्येक वॉरहेड स्वतंत्र लक्ष्यावर अचूक प्रहार करू शकते. त्यामुळे शेकडो किलोमीटर अंतरावरील वेगवेगळ्या ठिकाणांवर एकाचवेळी हल्ला करणे शक्य होते. क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीला चकवा देण्यासाठीही हे तंत्रज्ञान प्रभावी मानले जाते.

भारताने यापूर्वी मार्च २०२४ मध्ये 'मिशन दिव्यास्त्र' अंतर्गत अग्नी-५ ची एमआयआरव्ही चाचणी केली होती. मात्र, नव्या चाचणीमुळे भारताची प्रगत बहुलक्ष्यीय मारक क्षमता अधिक मजबूत झाल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, या चाचणीदरम्यान ओडिशा, पश्चिम बंगाल तसेच बांगलादेशातील काही किनारी भागांत आकाशात चमकदार धुराचे पट्टे दिसल्याने सोशल मीडियावर विविध चर्चांना उधाण आले होते. काहींनी याला "आगीची रेषा" किंवा "अज्ञात उडणारी वस्तू" असे संबोधले होते. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल डीआरडीओ, भारतीय लष्कर आणि संबंधित उद्योग भागीदारांचे अभिनंदन केले. "उदयोन्मुख सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हे यश भारताच्या संरक्षण सज्जतेत मोठी भर घालणारे आहे," असे त्यांनी म्हटले. 'अग्नी' मालिकेतील क्षेपणास्त्रे प्रामुख्याने चीन आणि पाकिस्तानसारख्या शेजारील देशांविरोधातील भारताची प्रतिरोधक क्षमता मजबूत करण्यासाठी विकसित करण्यात आली आहेत. एमआयआरव्ही आणि संभाव्य ५ हजार किलोमीटरपेक्षा अधिक पल्ल्यामुळे या क्षेपणास्त्राचे सामरिक महत्त्व आणखी वाढले आहे.

# भाजपविरोधात एकत्र येण्याचे ममतांचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार स्थापन झाल्यानंतर तृणमूल काँग्रेस प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपविरोधात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. राज्यातील सर्व विरोधी पक्ष, विद्यार्थी संघटना आणि स्वयंसेवी संस्थांनी संयुक्त व्यासपीठ तयार करून भाजपला आव्हान द्यावे, असे त्या म्हणाल्या.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची सुवेंदू अधिकारी यांनी शपथ घेतल्यानंतर काही तासांतच ममता बॅनर्जी यांनी ही भूमिका मांडली. कवी रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंतीनिमित्त कालीघाट येथील निवासस्थानाबाहेर आयोजित छोट्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

"डावे, अतिडावे आणि सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येण्याची ही वेळ आहे. राष्ट्रीय पक्षांनीही या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कोणत्याही राजकीय पक्षाला चर्चा करायची असल्यास आपण संवादासाठी तयार असल्याचेही त्यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर अत्याचार होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. "काही ठिकाणी गुंडगिरी सुरू आहे. भाजपच्या छावणीत काही वाईट प्रवृत्तींची घुसखोरी झाली आहे," असा आरोप त्यांनी केला. २०११ मध्ये सत्तेत आल्यानंतर आपण कोणावरही अन्याय होऊ दिला नाही, असा दावाही ममता बॅनर्जी यांनी केला.

## संपादकीय

## पश्चिम बंगालच्या भूमीत राष्ट्रवादी पहाट!



**बंगालच्या भूमीत आज एका नव्या राष्ट्रवादी पर्वाची पहाट झाली आहे. सुवेंदु अधिकारी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेत श्यामाप्रसाद मुखर्जींच्या स्वप्नातील सुवर्ण बंगालच्या उभारणीचा मार्ग प्रशस्त केला. तुष्टीकरण आणि भ्रष्टाचाराच्या अंधकारातून राज्याला बाहेर काढत आता खऱ्या अर्थाने सुशासनाचे, विकासाचे आणि सांस्कृतिक नवजागरणाचे युग अवतरेल.**

गेली अनेक दशके राजकीय हिंसाचार, वैचारिक दडपशाही आणि एका विशिष्ट वर्गाच्या लांगूलचालनाखाली गुदमरणाऱ्या पश्चिम बंगालने अखेर मोकळा श्वास घेतला आहे. कोलकात्याच्या ऐतिहासिक राजभवनात सुवेंदु अधिकारी आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने घेतलेली शपथ ही केवळ एका नव्या सरकारची स्थापना नसून, ती एका प्रदीर्घ आणि रक्तरंजित वैचारिक संघर्षाची फलश्रुती आहे. स्वामी विवेकानंद, ऋषी अरविंद, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या महान विचारांचा वारसा लाभलेली ही भूमी मधल्या काळात डाव्यांच्या लाल दहशतीने आणि त्यानंतर तृणमूलच्या अराजकतेने डागाळली गेली होती. मात्र, बंगालच्या जनतेने आपला खरा स्वभाव आणि राष्ट्रीय विचार पुन्हा एकदा उराशी बाळगत लोकशाहीच्या मार्गाने एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणली आहे. हा विजय त्या असंख्य अनामिक कार्यकर्त्यांच्या बलिदानाला वाहिलेली श्रद्धांजली आहे, ज्यांनी राष्ट्रवादाचा विचार रुजवण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. मागील सरकारचा कार्यकाळ हा 'कट-मनी', 'सिंडिकेट राज' आणि उघड तुष्टीकरणाचा काळ होता. व्होटबँकेच्या लांगूलचालनासाठी बहुसंख्याकांच्या श्रद्धा आणि सण-उत्सवांवर बंधने लादण्यापर्यंत मजल गेली होती. दुर्गापूजा किंवा सरस्वती पूजेसाठीही न्यायालयात जावे लागण्याची नामुष्की बंगालमधील हिंदूंवर ओढवली होती. परंतु, आता सुवेंदु अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील या नव्या सरकारने शपथ घेताच हा तुष्टीकरणाचा अंधार कायमचा दूर झाल्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. 'सबका साथ, सबका विकास' या राष्ट्रीय विचारधारेवर आधारित हे सरकार कोणत्याही एका विशिष्ट वर्गाचे लाड न करता, सर्वांना समान न्याय देईल, हा विश्वास आता जनमानसात निर्माण झाला आहे. सुवेंदु अधिकारी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, सत्तेच्या अमानुष दडपशाहीला छातीठोकपणे सामोरे जात जो लढा उभारला, त्याचे फळ आज संपूर्ण बंगालला मिळत आहे. वर्षानुवर्षे विकासापासून वंचित राहिलेल्या उत्तर बंगालला आणि विशेषतः मतुआ, राजवंशी यांसारख्या उपेक्षित समुदायांना या मंत्रिमंडळात सन्मानजनक स्थान देण्यात आले आहे. या नव्या सरकारसमोरील आव्हाने मात्र डोंगराएवढी आहेत. सर्वात पहिले आणि मोठे आव्हान आहे ते कायदा आणि सुव्यवस्थेचे. मागील सरकारच्या काळात पोलिसांचे झालेले राजकीयीकरण आणि गुंडांना मिळालेले अभय यामुळे राज्याची प्रतिमा मलिन झाली होती. राजकीय विरोधकांना संपवण्याची जी हिंमत गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी केली, त्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम आता नवनियुक्त गृहमंत्र्यांना प्राधान्याने करावे लागेल. बंगालमध्ये कायद्याचे राज्य आहे आणि इथे हिंसाचाराला कोणतेही स्थान नाही, हा संदेश प्रशासनाच्या तळागाळापर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर, सीमावर्ती राज्याला भेडसावणारी घुसखोरीची समस्या ही देशाच्या सुरक्षेसाठी मोठी डोकेदुखी ठरली होती. व्होटबँकेसाठी घुसखोरांना पायघड्या घालण्याचे धोरण आता कायमचे मोडीत काढले जाईल आणि सीमेपलीकडून येणाऱ्या राष्ट्रविघातक शक्तींचा बिमोड करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार एकाच दिशेने कठोर पावले उचलतील, यात कोणतीही शंका नाही. 'डबल इंजिन' सरकारचा सर्वात मोठा फायदा आता बंगालच्या अर्थव्यवस्थेला होणार आहे. केंद्राच्या योजना राज्यात प्रभावीपणे राबवून, पायाभूत सुविधांचा विकास करून आणि उद्योगांसाठी अनुकूल व भयमुक्त वातावरण निर्माण करून बंगालला पुन्हा एकदा प्रगतीच्या पथावर आणण्याचे मोठे शिवधनुष्य या मंत्रिमंडळाला पेलायचे आहे. राज्याला राष्ट्रीय प्रवाहापासून तोडण्याचा जो कुटील डाव खेळला गेला, तो हाणून पाडला आहे. अधिकारी यांचे सरकार राज्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी कटिबद्ध असेल. मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील प्रत्येकाला या ऐतिहासिक जनादेशाचे पावित्र्य राखायचे आहे. माँ दुर्गेच्या आशीर्वादाने सुरू झालेला हा राष्ट्रवादाचा नवा प्रवास बंगालला त्याच्या खऱ्या सांस्कृतिक आणि आर्थिक शिखरावर नेऊन ठेवेल, असा ठाम विश्वास आज प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाच्या मनात निर्माण झाला आहे. या नव्या पर्वाला आणि राष्ट्रनिर्माणाच्या या महायज्ञाला कोटी कोटी शुभेच्छा!

# राजकीय विश्लेषणाची बौद्धिक दिवाळखोरी!

**» निवडणुकांचे निकाल लागल्यावर प्रस्थापित सरकारच्या विरोधातील 'अँटी-इन्कम्बन्सी' हा शब्द परवलीचा बनतो. परंतु, केवळ या एकाच मोजपट्टीवर जनमताचा कौल मोजणे ही राजकीय विश्लेषकांची बौद्धिक दिवाळखोरी आहे.**

लोकशाहीच्या उत्सवात मतदान पार पडल्यानंतर आणि मतपेट्या (किंवा ईव्हीएम) उघडल्यानंतर, राजकीय विश्लेषकांच्या आणि चर्चासत्रांतील पंडितांच्या तोंडी सर्वाधिक ऐकू येणारा शब्द म्हणजे 'अँटी-इन्कम्बन्सी' अर्थात प्रस्थापित व्यवस्थेविरोधातील जनक्षोभ. कुठलेही सरकार पडले किंवा एखाद्या पक्षाला अनपेक्षित पराभवाला सामोरे जावे लागले, की त्याच्या अपयशाचे खापर या एका इंग्रजी शब्दावर फोडून मोकळे होण्याची एक अत्यंत सोयीस्कर पद्धत आपल्याकडे रूढ झाली आहे. केवळ प्रस्थापितविरोधी लाटेच्या चष्म्यातून निवडणुकांचे आकलन करणे, ही एक प्रकारची बौद्धिक दिवाळखोरी आहे.

जेव्हा एखादा प्रस्थापित नेता किंवा सत्ताधारी पक्ष निवडणूक हरतो, तेव्हा त्यामागे केवळ 'जनतेचा राग' हे एकच एकतर्फी कारण नसते, तर त्यामागे अनेक गुंतागुंतीचे पदर असतात. याचा अभ्यास करण्याऐवजी, 'अँटी-इन्कम्बन्सी'हा एकच सुळसुळीत




आणि गुळगुळीत शिक्का मारणे अत्यंत सोपे असते. 'जनतेचा आमच्यावर रोष होता, ती नैसर्गिक लाट होती' असे म्हणत आत्मपरीक्षण टाळण्याची आणि स्वतःचे संघटनात्मक अपयश लपवण्याची ही एक नामी शक्कल असते.

भारतीय मतदार हा आता गृहीत धरण्याइतका भाबडा आणि केवळ भावनिक आवाहनांना भुलणारा राहिलेला नाही. सत्तर किंवा ऐंशीच्या दशकात, जेव्हा माहितीची साधने मर्यादित होती आणि प्रस्थापित पक्षाचे एकछत्री वर्चस्व होते, तेव्हा खरोखरच संपूर्ण देशात किंवा राज्यात एकच लाट उसळत असे. आणीबाणीनंतरचा कौल किंवा बोफोर्सच्या आरोपानंतरची लाट, या काळात 'अँटी-इन्कम्बन्सी' हा शब्द खऱ्या अर्थाने लागू पडत होता. कारण तेव्हा नाराजी ही सार्वत्रिक आणि बव्हंशी एकांगी असे. आजचा मतदार हा अत्यंत व्यावहारिक झाला आहे. तो सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन अतिशय कठोरपणे आणि स्वतःच्या फायद्या-तोट्याच्या तराजूत करत असतो. जर एखादे सरकार खरोखरच कल्याणकारी योजना तळागाळापर्यंत आणि थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पोहोचवण्यात यशस्वी ठरले असेल, तर तिथे आपल्याला 'प्रो-इन्कम्बन्सी' (प्रस्थापितांच्या बाजूने कौल) पाहायला मिळते. अलीकडच्या काळात अनेक राज्यांमध्ये आणि केंद्रातही सरकारे पुन्हा पूर्ण बहुमताने निवडून आली आहेत, हे याच 'लाभार्थी' राजकारणाचे फलित आहे.

याशिवाय, निवडणुका जिंकणे किंवा हरणे हे आजकाल 'मायक्रो-मॅनेजमेंट' (सूक्ष्म नियोजन) आणि 'नॅरेटिव्ह' (कथानक) सेट करण्यावर अधिक अवलंबून असते. आजकालचे निवडणूक व्यवस्थापन हे 'डेटा'वर चालते. जो पक्ष प्रत्येक बूथवरील मतदारांच्या मानसिकतेचा आणि गरजांचा अचूक डेटा गोळा करून त्याप्रमाणे रणनीती आखतो, तो बाजी मारतो. अशा वेळी 'हवेचा कल' हा शब्द केवळ रंजक बातम्या बनवण्यासाठी उरतो.

आणखी एक अत्यंत दुर्लक्षित राहणारा मुद्दा म्हणजे, प्रस्थापित सरकारला असलेला विरोध हा आपोआपच विरोधी पक्षाच्या पारड्यात मते टाकतो, हा समजही आता कालबाह्य ठरत आहे. सरकारविषयी नाराजी असली, तरी ती व्यक्त करण्यासाठी सक्षम, विश्वासार्ह आणि आश्वासक पर्याय उपलब्ध आहे का, हे आजचा चोखंदळ मतदार पाहतो. जर विरोधी पक्ष विस्कळीत, दिशाहीन आणि केवळ विरोधाला विरोध करणारा असेल, तर मतदार नाइलाजाने का होईना, परंतु पुन्हा सत्ताधाऱ्यांनाच पसंती देतो. याचाच अर्थ असा की, केवळ सत्ताधाऱ्यांच्या अपयशावर विसंबून न राहता, विरोधकांना आपला स्वतःचा सकारात्मक आणि पर्यायी अजेंडा जनतेसमोर मांडावा लागतो. भारतीय लोकशाहीची आणि निवडणुकांची प्रक्रिया ही अतिशय सखोल, बहुपेडी आणि सतत बदलणारी आहे. तिला केवळ 'अँटी-इन्कम्बन्सी'च्या एकाच साच्यात बसवणे, हा मतदारांच्या राजकीय प्रगल्भतेचा आणि सजगतेचा थेट अपमान आहे.

राजकीय विश्लेषकांनी, प्रसारमाध्यमांनी आणि खुद्द राजकीय पक्षांनीही आता वातानुकूलित स्टुडिओतून आणि कार्यालयांतून बाहेर पडून, लोकांच्या थेट प्रश्नांना आणि त्यांच्या जगण्याच्या संघर्षाला भिडण्याची गरज आहे. समाजातील अंतःप्रवाह समजून घेण्याची संवेदनशीलता दाखवली पाहिजे. तर आणि तरच निवडणुकांचे आणि जनादेशाचे खरे अन्वयार्थ उलगडता येतील. अन्यथा, प्रत्येक निकालानंतर 'अँटी-इन्कम्बन्सी'ची ढाल पुढे करत, स्वतःच्या विश्लेषणात्मक मर्यादा आणि राजकीय अपयश झाकण्याचा हा बौद्धिक आळस असाच अव्याहतपणे सुरू राहील. हे थांबवणे आणि वास्तवाचे भान ठेवणे, हेच एका परिपक्व लोकशाहीचे खरे लक्षण आहे.

# स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषय लांबणीवर

### राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्वीकृत दहा नगरसेवकांच्या निवडीचा विषय पुन्हा एकदा लांबणीवर पडला असून सत्ताधारी भाजपने हा विषय मे महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेतून वगळला आहे. त्यामुळे महापालिका वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषय वारंवार तहकूब होत असल्याने विरोधी राष्ट्रवादी काँग्रेसने मागील सभेत जोरदार घोषणाबाजी केली होती. राष्ट्रवादीच्या सदस्यांनी महापौरांच्या आसनासमोर आंदोलन करत "आमची तीन नावे



जाहीर करा, उर्वरित सात नावे सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या सोयीनुसार जाहीर करावीत," असा टोला लगावला होता.

सत्ताधाऱ्यांकडून सात नावांवर अद्याप एकमत झाले नसल्याची चर्चा असून त्यामुळेच हा विषय सलग तिसऱ्यांदा तहकूब करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. ५ मे रोजी झालेल्या तहकूब सभेतही हा विषय पुढे ढकलण्यात आला होता. त्यावेळी विरोधकांनी तीव्र आक्षेप घेतल्याने सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर महापौर रवी लांडगे यांनी सभा १५ मिनिटांसाठी तहकूब केली होती.

दरम्यान, १५ मे रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेची विषयपत्रिका महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, त्यात स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषय नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. नियमानुसार तहकूब झालेला विषय पुढील सभेत घेणे अपेक्षित असते. त्यामुळे हा विषय दप्तरी दाखल करण्यात आला आहे का, किंवा सत्ताधाऱ्यांना स्वीकृत नगरसेवकांची निवडच करायची नाही का, अशा शंका उपस्थित केल्या जात आहेत. मार्च आणि एप्रिल महिन्यांच्या सभांमध्येही हा विषय होता. तसेच ५ मेच्या तहकूब सभेतही तो चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. मात्र, प्रत्येक वेळी तो पुढे ढकलण्यात आल्याने विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर टीका केली जात आहे.

महापौर रवी लांडगे यांनी हा विषय १५ जूनपर्यंत तहकूब केल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मे महिन्याच्या विषयपत्रिकेत त्याचा समावेश करण्यात आलेला नाही. "सभागृहात झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी नगर सचिव विभागाकडून केली जाते," असे महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप यांनी स्पष्ट केले.

# महापालिका शाळांचा निकाल ८८.५९ टक्के

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महापालिकेच्या १७ मराठी माध्यम शाळांचा एकूण निकाल ८८.५९ टक्के लागला असून उर्दू माध्यमाच्या ८ शाळांनी ९७.८७ टक्के निकालाची नोंद केली आहे.

महापालिकेकडून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचे सकारात्मक परिणाम या निकालातून दिसून आल्याची प्रतिक्रिया शिक्षण विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. यंदा दहावीच्या परीक्षेसाठी महापालिकेच्या मराठी आणि उर्दू माध्यमाच्या २५ माध्यमिक शाळांमधून एकूण २ हजार ९२५ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी २ हजार ९०९ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित राहिले. परीक्षेत २ हजार ६२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून २८४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. तर १६ विद्यार्थी गैरहजर राहिले. निकालामध्ये ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ९३ इतकी आहे. त्यापैकी ८५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे ५८ विद्यार्थी आहे. महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे तसेच प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे अभिनंदन केले आहे.

# थेरगावमध्ये पवना नदी पुन्हा फेसाळली...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** थेरगाव येथील केजुदेवी बंधारा परिसरात शुक्रवारी सकाळी पवना नदीपात्र पुन्हा फेसाळल्याचे चित्र दिसून आले. यंदाच्या वर्षातील ही तिसरी घटना असून नदीत रसायनयुक्त सांडपाणी मिसळले जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सकाळी मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांसह बोट क्लब परिसरात आलेल्या खेळाडूंनी नदीतील वाढते प्रदूषण पाहून चिंता व्यक्त केली. हिरवाईने नटलेल्या परिसरातून वाहणाऱ्या पवनामाईचे बदललेले स्वरूप पाहून स्थानिक नागरिकांनी प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वारंवार अशा घटना घडत असतानाही ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. औद्योगिक कंपन्यांचे रासायनिक सांडपाणी तसेच प्रक्रिया न केलेले पाणी थेट नदीत सोडले जात असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. अनेक नाले थेट नदीला मिळत असल्यानेही प्रदूषणात वाढ होत असल्याचे सांगितले जात आहे. पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारी पवना नदी दूषित होत असल्याने भविष्यात गंभीर पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# दापोडी-फुगेवाडीला वाहतूक कोंडीचा विळखा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील दापोडी, फुगेवाडी आणि कासारवाडी परिसरातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अरुंद अंतर्गत रस्ते, संथगतीने सुरू असलेली विकासकामे, बेशिस्त वाहनचालक आणि महामार्गालगतचे अनियोजित पार्किंग यामुळे संपूर्ण परिसर वाहनांच्या रांगांनी गजबजून गेला आहे.

सकाळ आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळी काही किलोमीटरचा प्रवास करण्यासाठी नागरिकांना अर्धा ते एक तास खर्च करावा लागत आहे. त्यामुळे वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दापोडी परिसरातील पेट्रोल, डिझेल आणि सीएनजी पंपांवर जाण्यासाठी अनेक वाहनचालक विरुद्ध दिशेने वाहने चालवत असल्याचे प्रकार रोजच घडत आहेत. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा वेग मंदावत असून अपघाताचा धोका वाढत आहे. मेट्रो स्थानक परिसरातही पादचारी नियोजित मार्गाऐवजी थेट रस्ता ओलांडत असल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे. फुगेवाडी परिसरात महामार्गालगत बेशिस्तपणे उभी केलेली वाहने वाहतुकीस मोठा अडथळा ठरत आहेत. त्यातच दापोडी, फुगेवाडी आणि कासारवाडी परिसरातील रस्त्यांवर अनेक दिवसांपासून बंद आणि धूळ खात पडलेली वाहने हटविण्यात आलेली नाहीत. या अतिक्रमणामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली असून वाहतुकीचा ताळमेळ पूर्णपणे बिघडला आहे. परिणामी दापोडी रेल्वे स्थानकापासून फुगेवाडी आणि कासारवाडीपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत.

बीआरटी मार्गावरील डांबरीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने नागरिकांच्या अडचणीत अधिक भर पडत आहे. अनेक महिन्यांपासून अर्धवट खोदलेले रस्ते, धूळ आणि राडारोड्यामुळे वाहनचालकांसह पादचारीही त्रस्त झाले आहेत. व्यापाऱ्यांनाही या परिस्थितीचा आर्थिक फटका बसत असून ग्राहकांची संख्या कमी झाल्याची तक्रार व्यावसायिकांकडून केली जात आहे. वाहतूक पोलिसांनी केवळ दंडात्मक कारवाई न करता विरुद्ध दिशेने वाहन चालविणारे आणि रस्त्याच्या मधोमध वाहने उभी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच महामार्गालगतचे अतिक्रमण हटवून वाहतुकीचे योग्य नियोजन करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत बीआरटीचे रखडलेले काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावे, मेट्रो स्थानक परिसरात सुरक्षित पादचारी मार्ग उभारावेत, महामार्गालगतचे बेशिस्त पार्किंग रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवावी आणि गर्दीच्या वेळेत अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

### ५२६ कोटींच्या योजनेमुळे नदी प्रदूषणमुक्त होणार

# इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला लवकरच सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाला आता प्रत्यक्ष गती मिळण्याची चिन्हे आहेत. अमृत २.० योजनेंतर्गत मंजुरी मिळालेल्या या ५२६ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. या प्रकल्पामुळे इंद्रायणी नदीतील प्रदूषण कमी होऊन आळंदी येथे येणाऱ्या लाखो भाविक आणि वारकऱ्यांना स्वच्छ पाणी उपलब्ध होणार असल्याचा



दावा प्रशासनाने केला आहे.

इंद्रायणी नदीची एक बाजू पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत तर दुसरी बाजू पीएमआरडीए क्षेत्रात येते. निघोजे ते चऱ्होलीदरम्यान सुमारे १८.५० किलोमीटर अंतरावर महापालिका हा प्रकल्प राबविणार आहे. नदी प्रदूषणमुक्त करण्यासोबतच नदीकाठाचे सुशोभीकरण आणि पर्यावरण संवर्धन यावरही या योजनेत भर देण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी २० जून २०२३ रोजी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. त्याला २९ ऑगस्ट २०२५ रोजी तांत्रिक मान्यता मिळाली. एकूण ५२६ कोटी रुपयांच्या खर्चाच्या या प्रकल्पासाठी केंद्र आणि राज्य शासन प्रत्येकी २५ टक्के निधी देणार असून सुमारे २६३ कोटी रुपये शासनाकडून उपलब्ध होणार आहेत. उर्वरित ५० टक्के खर्च महापालिका करणार आहे.

प्रकल्पांतर्गत चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी परिसरात ४० एमएलडी क्षमतेचे, तर डुडुळगाव येथे २० एमएलडी क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यात येणार आहे. शहरातील नाले आणि ड्रेनेज लाईनद्वारे थेट इंद्रायणी नदीत मिसळणारे सांडपाणी या एसटीपीकडे वळविले जाणार आहे. प्रक्रिया केल्यानंतरच हे पाणी नदीत सोडण्यात येणार असल्याने नदी प्रदूषणात मोठी घट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नदीकाठावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे.

यामध्ये देशी वृक्ष, हिरवळ, शोभिवंत झाडे, उद्याने, जॉगिंग ट्रॅक, पादचारी मार्ग आणि विसर्जन घाट उभारले जाणार आहेत. त्यामुळे नदी परिसर अधिक आकर्षक आणि पर्यावरणपूरक बनणार आहे. तसेच नदीकाठावरील अतिक्रमणांवरही नियंत्रण मिळविण्यास मदत होणार आहे.

महापालिकेने या कामासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली असून एल. सी. इन्फा, दिनेशचंद आर इन्फा आणि एसएमसी इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. या तीन कंपन्यांनी प्रतिसाद दिला आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरू केले जाणार असून पुढील दोन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. इंद्रायणी नदी ही आळंदीच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग मानली जाते. मात्र गेल्या काही वर्षांत वाढते शहरीकरण, सांडपाण्याचा विसर्ग आणि अतिक्रमणांमुळे नदीचे प्रदूषण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेचा हा प्रकल्प नदी संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये नामकरणाचा धडाका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या तहकूब सर्वसाधारण सभेत विविध रुग्णालये, रस्ते, चौक, उद्याने आणि सार्वजनिक ठिकाणांच्या नामकरणाच्या उपसूचनांना मंजुरी देण्यात आली.

नवीन भोसरी रुग्णालयाला माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच, थेरगाव येथे उभारण्यात येणाऱ्या नियोजित कर्करोग रुग्णालयाला दिवंगत आमदार लोकनेते लक्ष्मण जगताप यांचे नाव देण्यात येणार आहे. पिंपळे गुरव येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र आणि बसस्थानकालाही लक्ष्मण जगताप यांचे नाव देण्यात येणार आहे. भोसरी ते आळंदी रस्त्यास 'वारकरी भक्ती मार्ग' असे नाव देण्यात आले असून दापोडी ते निगडी या जुन्या मुंबई-पुणे महामार्गास 'अण्णासाहेब मगर हमरस्ता' असे नामकरण करण्यात आले आहे.

तळवडे येथे विकसित होत असलेल्या बायोडायव्हर्सिटी पार्कला उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्यालाही मंजुरी देण्यात आली. याशिवाय शहरातील विविध चौक, उद्याने, सभागृह, पुल आणि रस्त्यांना छत्रपती संभाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. केशव हेडगेवार, अटल बिहारी वाजपेयी, सावता महाराज आदींची नावे देण्यात आली आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र

# पुणे जिल्हा

रविवार,
दि. १० मे, २०२६



## सारांश वृत्त

### लाच घेताना तलाठी व कोतवाल जाळ्यात

**पुणे** : वारसनोंद करण्यासाठी ५ हजार ५०० रुपयांची लाच स्वीकारताना तलाठी आणि कोतवालाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पुणे पथकाने रंगेहात पकडल्याची घटना खेड तालुक्यात उघडकीस आली आहे. निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालयात गुरुवारी दुपारी झालेल्या या कारवाईमुळे महसूल विभागातील भ्रष्टाचार पुन्हा चर्चेत आला आहे. मनीषा साहेबराव माने (वय ४५), ग्राम महसूल अधिकारी तथा तलाठी, निमगाव खंडोबा आणि दत्तात्रय छबू चव्हाण (वय ५८), कोतवाल, निमगाव खंडोबा अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. दोघांविरोधात खेड राजगुरूनगर पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ३४ वर्षीय तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदारांच्या वडिलांच्या नावावर खरपुडी बुद्रुक येथील वडिलोपार्जित जमीन असून त्यांच्या निधनानंतर वारसनोंद करण्यासाठी ६ मार्च २०२६ रोजी निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालयात अर्ज करण्यात आला होता. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही वारसनोंद केली जात नसल्याची तक्रार होती.


तक्रारदार वारसनोंदीबाबत चौकशीसाठी कार्यालयात गेले असता तलाठी माने यांनी कोतवाल चव्हाण यांच्यामार्फत पैशांची मागणी केल्याचे समोर आले. सुरुवातीला ६ हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर तडजोडीअंती ५०० रुपये स्टॅम्पसाठी आणि ५ हजार रुपये वारसनोंदीसाठी अशी एकूण ५ हजार ५०० रुपयांची मागणी करण्यात आली. तक्रारीनंतर एसीबीने पडताळणी करून सापळा रचला. गुरुवारी निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालयात लाचेची रक्कम स्वीकारताना तलाठी मनीषा माने आणि कोतवाल दत्तात्रय चव्हाण यांना रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास एसीबीचे पोलिस निरीक्षक अविनाश घरबुडे करत आहेत.

### सलग दुसऱ्या दिवशी सीसीटीव्हीत कैद

# चाकण एमआयडीसीत बिबट्याचा वावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण** : चाकण एमआयडीसी परिसरातील दोन नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आवारात बिबट्याचा वावर आढळल्याने औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सॅनी हेवी इंडस्ट्रीज आणि मर्सिडीज बेंझ कंपनी परिसरात सलग दोन दिवस बिबट्या दिसून आल्याने कामगार आणि कर्मचारी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.



विशेष म्हणजे, कंपनीच्या उत्पादन विभागाजवळील आतील परिसरातही बिबट्याचा मुक्त वावर आढळल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. वन विभागाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिसरात शोधमोहीम सुरू केली असून बिबट्या दिसून आलेल्या ठिकाणी दोन पिंजरे लावण्यात आले आहेत.

गुरुवारी (दि. ७ मे) सॅनी हेवी इंडस्ट्रीज कंपनीच्या आवारात प्रथम बिबट्या दिसून आला. त्यानंतर शुक्रवारी सकाळच्या सुमारास मर्सिडीज बेंझ कंपनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्येही बिबट्या फिरताना कैद झाला. सुरुवातीला कंपनी प्रशासनाने वन विभागाशी संपर्क साधत माहिती दिली. वन विभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र, पहिल्या दिवशी बिबट्याचा ठावठिकाणा लागला नाही.

दरम्यान, काही कामगारांनी प्रत्यक्ष बिबट्याला पाहिल्याचा दावा केल्याने परिसरात अधिकच भीतीचे वातावरण निर्माण झाले. कंपनी प्रशासनाने कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या असून अनावश्यक गर्दी टाळण्याचे आवाहन केले आहे.

शुक्रवारी वन विभागाने पुन्हा परिसराची पाहणी केली. मात्र, बिबट्या प्रत्यक्ष आढळून आला नाही. "सीसीटीव्ही फुटेजमध्ये बिबट्या स्पष्ट दिसून आला असून खबरदारी म्हणून दोन पिंजरे लावण्यात आले आहेत," अशी माहिती चाकण वन विभागाचे अधिकारी संतोष कंक यांनी दिली. चार वर्षांपूर्वीही मर्सिडीज बेंझ कंपनी परिसरात बिबट्या शिरल्याची घटना घडली होती. २१ मार्च २०२२ रोजी पहाटे बिबट्या कंपनीत शिरल्यानंतर चाकण वन विभाग, माणिकडोह बिबट निवारा केंद्र आणि बचाव पथकाने पाच तासांच्या प्रयत्नांनंतर त्याला जेरबंद केले होते. आता पुन्हा त्याच परिसरात बिबट्या दिसल्याने नागरिकांमध्ये भीती वाढली आहे. वन विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, भक्ष्याच्या शोधात बिबट्या आळंदी फाटा परिसरातील वनहद्दीतून किंवा कुरुळी-निघोजे भागातील शेती परिसरातून एमआयडीसी भागात शिरला असावा. मात्र, तो नेमका कोणत्या मार्गाने कंपनी परिसरात पोहोचला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

उत्तर पुणे जिल्ह्यातील जंगलालगत मानवी वस्त्या, औद्योगिक वसाहती आणि वाढती जंगलतोड यामुळे बिबट्यांचे वास्तव्य मानवी परिसराकडे वाढत असल्याचे चित्र आहे. पाळीव प्राणी, कुत्री, शेळ्या-मेंढ्या हे बिबट्यांचे सहज उपलब्ध भक्ष्य ठरत असल्याने ते वारंवार मानवी वस्तीकडे वळत असल्याचे वन्यजीव अभ्यासक सांगत आहेत.

## भामा-आसखेड धरणातून विसर्ग; बंधारे भरल्याने शेतकऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**खेड** : पुणे जलसंपदा विभागाने शेतकऱ्यांच्या मागणीनुसार भामा-आसखेड धरणातून पाणी सोडल्याने खेड तालुक्यातील सिद्धेगव्हाणपर्यंतचे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे पाण्याने भरले आहेत. या पाण्याचा मोठा फायदा उन्हाळी पिकांना होत असून शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. सध्या धरणात ४७.४७ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने प्रशासन आणि शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

८.१४ टीएमसी क्षमतेचे भामा-आसखेड धरण खेड, शिरूर, दौंड आणि हवेली या चार तालुक्यांसाठी महत्त्वाचे मानले जाते. या धरणातून शेतीसाठी पाणीपुरवठा केला जातो, तसेच अनेक गावांच्या पिण्याच्या पाण्याची गरजही भागवली जाते. याशिवाय पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काही भागांनाही या धरणातून पाणीपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांच्या मागणीनंतर जलसंपदा विभागाने दि. २९ एप्रिल ते १ मेदरम्यान तीन दिवस धरणातून पाणी सोडले होते. त्यामुळे सिद्धेगव्हाणपर्यंत भीमा आणि भामा नदीवरील बंधारे पाण्याने भरले आहेत. या पाण्याचा वापर शेतकरी उन्हाळी पिकांसाठी करत असून त्यामुळे पिकांना मोठा आधार मिळाला आहे. पावसाळा सुरू होण्यासाठी एक महिना शिल्लक असताना धरणातील उपलब्ध पाणीसाठा समाधानकारक मानला जात आहे. जिल्ह्यातील इतर धरणांच्या तुलनेत भामा-आसखेड धरणातील पाणीसाठा अधिक असल्याचेही समोर आले आहे.

जलसंपदा विभागाकडून लवकरच तिसरे उन्हाळी आवर्तन सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कालवा समितीच्या नियोजनानुसार दौंड तालुक्यातील आलेगावपागापर्यंतचे एकूण १८ बंधारे पाण्याने भरले जाणार आहेत. अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजनांनाही फायदा होणार आहे.

## कांदा साठवणुकीसाठी भन्नाट क्लुप्त्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात यंदाच्या हंगामातील कांदा काढणीची कामे जवळपास पूर्ण झाली असून शेतकऱ्यांनी कांदा सुरक्षितरीत्या बराकी व आधुनिक कांदा चाळींमध्ये साठवण्यास सुरुवात केली आहे. कांदा दीर्घकाळ टिकून राहावा, सडू नये आणि योग्य बाजारभाव मिळेपर्यंत सुरक्षित राहावा, यासाठी शेतकरी विविध आधुनिक उपाययोजना करताना दिसत आहेत.



या भागातील पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, थोरांदळे आदी गावांमध्ये गेल्या चार-पाच वर्षांपासून कांदा साठवणुकीच्या पद्धतीत मोठा बदल झाला आहे. पारंपरिक पद्धतीऐवजी आता आधुनिक कांदा चाळींना शेतकऱ्यांची पसंती मिळत आहे. अनेक शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्च करून मोठमोठ्या शेड्स उभारल्या असून त्यामध्ये गोलाकार पद्धतीने कांदा साठवला जात आहे. विशेष म्हणजे, लोखंडी तारेच्या जाळीचा वापर करून तयार करण्यात आलेल्या गोलाकार रचनेमध्ये कांदे ठेवले जात आहेत. या पद्धतीमुळे कांद्यांना चोहोबाजूंनी हवा मिळते. परिणामी, कांदा सडत नाही तसेच दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते. उष्णता आणि ओलावा कमी राहिल्याने कांद्याचे नुकसानही कमी होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

कांद्याचे बाजारभाव सतत चढ-उतार होत असल्याने शेतकरी लगेच विक्री करण्याऐवजी साठवणुकीवर भर देत आहेत. बाजारभावात वाढ होताच टप्प्याटप्प्याने कांदा विक्रीसाठी बाहेर काढला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळण्यास मदत होत आहे. पूर्व भागातील काही शेतकऱ्यांनी तर जवळपास वर्षभर कांदा साठवून ठेवण्याची किमया साधली आहे. खेळती हवा, मजबूत चाळी आणि काळजीपूर्वक साठवणूक यामुळेच कांदा दीर्घकाळ टिकून राहत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

सध्या वाढत्या खर्चाच्या काळात कांदा पिकातून चांगले उत्पन्न मिळवण्यासाठी शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या साठवणूक पद्धतींचा प्रभावी वापर करत असल्याचे चित्र आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात पाहायला मिळत आहे.

## जनगणना नियुक्तीविरोधात अंगणवाडी सेविकांचे धरणे

### खेड तहसील कार्यालयासमोर आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : जनगणना २०२६-२७ साठी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून करण्यात आलेली नियुक्ती रद्द करावी, या मागणीसाठी खेड तहसील कार्यालयासमोर गुरुवारी अंगणवाडी कर्मचारी कृती समितीच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात खेड तालुक्यातील अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



खेड तहसीलदार कार्यालयाकडून जनगणनेसाठी कर्मचारी अपुरे पडत असल्याने अंगणवाडी सेविकांची प्रगणक व पर्यवेक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याच्या नोटिसाही देण्यात आल्या आहेत. मात्र, आपल्या नियमित कामाव्यतिरिक्त अन्य कोणतेही काम देऊ नये, अशी भूमिका अंगणवाडी सेविकांनी घेत या अतिरिक्त कामाला सामूहिक विरोध दर्शविला आहे.

प्रशिक्षणासाठी अनुपस्थित राहणाऱ्या सेविकांवर जनगणना अधिनियम १९४८ च्या कलम ११ अंतर्गत कारवाईचा इशारा तहसील प्रशासनाने दिल्यानंतर अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. अंगणवाडी कर्मचारी संघटनेने प्रशासनावर आरोप करत सर्वोच्च न्यायालयाने पल्स पोलिओ मोहिमेशिवाय अन्य कोणतेही काम अंगणवाडी सेविकांकडून घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश दिले असतानाही जनगणनेची जबाबदारी दिली जात असल्याचे म्हटले आहे. या निर्णयामुळे अंगणवाडी कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून नियुक्ती आदेश मागे घेण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य कृती समितीचे निमंत्रक निलेश दातखिळे आणि कॉम्रेड सुभा शमीन यांनी केले. यावेळी किसान महासभेचे कॉम्रेड महेंद्र थोरात, तालुका निमंत्रक आरती थिगळे, दिपाली ठाकूर, सोनाली पावडे, सारिका थोरवे, माया राक्षे, अश्विनी कुटे, सुरेखा वाडेकर, अपर्णा वाघुले यांच्यासह मोठ्या संख्येने अंगणवाडी कर्मचारी महिला उपस्थित होत्या.

दरम्यान, "भारत जनगणना आणि इतर सर्वेक्षणांसाठी तालुक्यात कर्मचारी संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात अंगणवाडी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशिक्षणानंतर कर्मचारी संख्या कमी पडल्यासच त्यांना कामात सहभागी केले जाईल," अशी माहिती नायब तहसीलदार राम बीजे यांनी दिली.

## कोबी-फ्लॉवर लागवडीला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील शिंगवे-पारगाव परिसरात सध्या कोबी आणि फ्लॉवर लागवडीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. सध्या या दोन्ही नगदी पिकांना अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. मात्र, १५ जूननंतर शाळा सुरू झाल्यानंतर बाजारातील मागणी वाढेल आणि त्यानंतर बाजारभावात सुधारणा होईल, अशी आशा शेतकरी व्यक्त करत आहेत.



तालुक्याच्या पूर्व भागातील पारगाव, शिंगवे, रांजणी, वळती, नागापूर, थोरांदळे आदी गावांमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणावर कोबी व फ्लॉवरची लागवड केली जाते. या भागातील अनेक शेतकऱ्यांचा या नगदी पिकांकडे कल वाढलेला आहे. मात्र, मागील काही महिन्यांपासून बाजारभावाची साथ मिळत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. सध्या कोबीला दहा किलोसाठी सुमारे ८० रुपये बाजारभाव मिळत असून फ्लॉवरलाही जवळपास त्याच दराने विक्री करावी लागत आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा दर अत्यंत कमी असल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत.

शिंगवे येथील शेतकरी शंकर कासार यांनी सांगितले की, "शाळा सुरू झाल्यानंतर कोबी आणि फ्लॉवरला चांगली मागणी वाढते. त्यामुळे बाजारभावात सुधारणा होईल, या अपेक्षेने आम्ही लागवड केली आहे." त्यांनी पुढे सांगितले की, कोबी-फ्लॉवरची रोपे सध्या एक रुपया प्रति नग दराने खरेदी करावी लागत आहेत. यापूर्वी हीच रोपे ९० पैशांना मिळत होती.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय घडामोडींचाही शेतीवर परिणाम होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे वाहतूक व इतर खर्च वाढल्याचा परिणाम शेती उत्पादनावर होत आहे. शेतकरी प्रकाश वाघ यांनी सांगितले की, "युद्धामुळे उत्पादन खर्च वाढत आहे. मात्र, शेतमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे."

## अपघात प्रकरणी वाहन चालकास पाच वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवून एका दुचाकीस्वाराच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या चालकास राजगुरुनगर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. न्यायाधीश ए. एस. सय्यद यांनी हा निकाल दिला. राहुल सोपान हजारे (रा. कन्हेरसर, ता. खेड) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणातील माहिती अशी की, २ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास गोसासी गावच्या हद्दीत पाबळ रस्त्यावर आरोपी राहुल हजारे हा त्याच्या ताब्यातील रिट्झ कार (एमएच १४ एफसी ५३५७) भरधाव आणि निष्काळजीपणे चालवत होता. पाबळकडून खेडकडे जात असताना त्याने समोरून येणाऱ्या ट्रॅव्हल्स बसला (एमएच १४ सीडब्ल्यू ०२९७) चुकीच्या बाजूने जाऊन जोरदार धडक दिली. त्यानंतर पाठीमागून येणाऱ्या हिरो आयस्मार्ट दुचाकीलाही (एमएच १४ एफएच ३२९६) धडक बसली. या अपघातात दुचाकीस्वार संजय राजाराम पवळे (रा. रेटवडी, ता. खेड) गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सत्यवान शिवराम काळे यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलिस निरीक्षक आदित्य लोणीकर यांनी या प्रकरणाचा तपास केला.

सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील संदीप वाघ यांनी सहा साक्षीदार तपासले. त्यापैकी तीन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष महत्त्वाची ठरली.

## सातकरस्थळ येथे दाखल्यांचे वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर** : खेड तालुक्यातील सातकरस्थळ येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरा'अंतर्गत शुक्रवारी विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात आयोजित या शिबिरात एकूण ३९४ विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.




आमदार बाबाजी काळे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रांताधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शासन आपल्या दारी या संकल्पनेतून महसूल विभागासह विविध शासकीय विभागांचे स्टॉल उभारण्यात आले होते. शिबिरात ई-फेरफार प्रणालीअंतर्गत १०७ फेरफार मंजूर करण्यात आले. त्याचबरोबर १४७ सातबारा उतारे आणि ६३ '८-अ' उताऱ्यांचे वितरण करण्यात आले. कलम १५५ अंतर्गत १२ अर्ज प्राप्त झाले. रेशनकार्डसाठी १३ कुटुंबांना कार्डांचे वाटप करण्यात आले असून आणखी २८ अर्ज स्वीकारण्यात आले.

पीएम किसान योजनेअंतर्गत पाच लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. तसेच संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ योजनेतील १३ लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या योजनांसाठी आणखी १९ अर्ज स्वीकारण्यात आले. विद्यार्थ्यांना डोमिसाईल, जात आणि उत्पन्नाचे दाखले देण्यात आले. विविध प्रकारचे एकूण ३०४ दाखले मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले, तर २३६ नवीन अर्ज स्वीकारण्यात आले. जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत १०७ वारस नोंदी मंजूर करून दुरुस्त सातबारा वितरित करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या तनुजाताई घनवट, दीप्तीताई भोगाडे, पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते, निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, महसूल नायब तहसीलदार राम बिजे, निवडणूक नायब तहसीलदार मनिषा खैरे, मंडळ अधिकारी गणेश रोकडे तसेच विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

### आंबेगावच्या फुल उत्पादक शेतकऱ्यांना चिंता

# लग्नसराईतही झेंडूला भाव नसल्याने नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : लग्नसराईचा हंगाम जोरात सुरू असतानाही झेंडूच्या फुलांना समाधानकारक बाजारभाव मिळत नसल्याने आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील फुल उत्पादक शेतकरी चिंतेत सापडले आहेत.

यात्रा, उत्सव आणि लग्नसराईचा हंगाम लक्षात घेऊन परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी यंदा मोठ्या प्रमाणात झेंडूच्या विविध जातींची लागवड केली होती. मात्र, अपेक्षित मागणी असूनही बाजारभावात वाढ न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.



दरवर्षी लग्नसराई आणि यात्रा हंगामात झेंडूच्या फुलांना चांगला दर मिळत असल्याने अनेक शेतकरी जाणीवपूर्वक या पिकाकडे वळतात. यंदाही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात झेंडूची लागवड करताना मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. काही शेतकऱ्यांनी मार्बल पिवळा, मार्बल यलो यांसारख्या जातींची लागवड करून मोठे भांडवल गुंतवले आहे. मात्र, सध्या झेंडूच्या फुलांना केवळ प्रतिकिलो २५ ते ३० रुपये असा दर मिळत आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत हा दर अत्यंत कमी असल्याने गुंतवलेले भांडवल परत मिळेल की नाही, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. खत, औषधे, मजुरी, ठिबक सिंचन आणि मल्चिंग पेपर यासाठी मोठा खर्च झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

परिसरातील बहुतांश फुले स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी केली जात असून मोठी बाजारपेठ उपलब्ध नसल्याने दरावर परिणाम होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. लग्नसराईचा हंगाम सुरू असूनही अपेक्षित मागणी निर्माण होत नसल्याने उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत.

याबाबत वळती येथील शेतकरी वसंत लोखंडे यांनी सांगितले की, "सध्या झेंडूच्या फुलांना प्रतिकिलो २५ ते ३० रुपये दर मिळत आहे. हा दर अत्यंत कमी असून किमान ५० रुपयांपेक्षा अधिक दर मिळाल्यास तरी उत्पादन खर्च निघू शकतो. आम्ही मार्बल पिवळा, मार्बल यलो जातींची लागवड केली आहे. त्यासाठी मल्चिंग आणि ठिबक सिंचनाचा वापर केला आहे. मात्र, कमी बाजारभावामुळे मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे."

## उन्हाळी बाजरी मळणीला प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात उन्हाळी बाजरी काढणीची कामे पूर्ण होऊन आता मळणीला प्रारंभ झाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून वातावरणात पुन्हा बदल होत असल्याने शेतकऱ्यांनी बाजरी मळणीची लगबग सुरू केली आहे.

तालुक्याच्या पूर्व भागातील बहुतांश गावांमध्ये उन्हाळी बाजरीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. दरवर्षी स्वच्छ हवामान आणि मुबलक पाणी उपलब्ध होत असल्याने बाजरीचे उत्पादन चांगले मिळते. उन्हाळी बाजरी पिकातून शेतकऱ्यांना दुहेरी फायदा मिळतो. खाण्यासाठी धान्य तसेच जनावरांसाठी वैरणही या पिकातून उपलब्ध होत असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर बाजरीची लागवड करतात. यंदा सुरुवातीपासूनच बाजरी पिकाला स्वच्छ हवामानाची साथ मिळाली. तसेच शेवटपर्यंत मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्याने उत्पादनात वाढ झाली आहे.

मध्यंतरी झालेल्या अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी बाजरीचे पीक झोडपून काढावे लागले. मात्र, त्याचा फारसा परिणाम उत्पादनावर झाला नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

सध्या बाजरी काढणीची कामे पूर्ण झाली असून शेतकरी मळणीकडे वळले आहेत. यंत्राद्वारे बाजरीची मळणी करण्यात येत असून कमी वेळेत आणि कमी कष्टात काम पूर्ण होत असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## सारांश वृत्त

### सुवेंदू अधिकारी यांचे अभिनंदन

**भुवनेश्वर :** ओडिशाचे विरोधी पक्षनेते नवीन पटनाईक यांनी शनिवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे अभिनंदन केले. ओडिशाचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले पटनायक म्हणाले की, अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगाल विकासाची नवीन उंची गाठेल अशी आशा आहे. बिजू जनता दलाच्या अध्यक्षांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे की, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याबद्दल सुवेंदू अधिकारी यांचे अभिनंदन, अशा शब्दांत त्यांनी अधिकारी यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### नवे सरकार 'सोनार बांगला'ची पुनर्बांधणी करेल : हिमंता सरमा

**कोलकाता :** पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे नवे सरकार 'सोनार बांगला'ची पुनर्बांधणी करेल, अशी आशा आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी शुक्रवारी व्यक्त केली. कोलकाता येथील ब्रिगेड परेड ग्राउंडवर अधिकारी यांच्या शपथविधी सोहळ्याच्या वेळी सरमा म्हणाले की, 'अंग, बंग, कलिंग आणि प्राग्ज्योतिषपूर' आता सनातनी मूल्यांचे जतन करण्यासाठी खोलवर रुजलेल्या पक्षाद्वारे शासित आहेत. एकेकाळी या प्रदेशावर राज्य करणाऱ्या प्राचीन राज्यांचा त्यांनी उल्लेख केला.

### प्रेमसिंग तमांग यांच्याही शुभेच्छा

**गंगटोक :** सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांनी शनिवारी पश्चिम बंगालमधील पहिल्या भाजप सरकारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेल्या शुभेंदू अधिकारी यांना शुभेच्छा दिल्या. पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री म्हणून अधिकारी यांचा शपथविधी हा ऐतिहासिक मैलाचा दगड असल्याचे सांगून तमांग यांनी आशा व्यक्त केली की, नवीन प्रशासन बंगालच्या जनतेसाठी विकास, पारदर्शक प्रशासन आणि सर्वसमावेशक प्रगतीचे युग सुरू करेल. पश्चिम बंगालमधील भाजप सरकारच्या शपथविधी सोहळ्याला तमांग यांनी हजेरी लावली.

## पंतप्रधान मोदींसह मान्यवरांकडून अभिवादन

# रवींद्रनाथ टागोर यांची जयंती उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** विश्वकवी रवींद्रनाथ टागोर यांच्या १६५ व्या जयंतीनिमित्त आज 'पोचिशे बोइशाख' देश-विदेशात उत्साहात साजरी करण्यात आली. पश्चिम बंगाल, शांतिनिकेतन, विश्वभारती विद्यापीठ तसेच बांगलादेशात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून रवींद्र संगीत, कविता, नृत्य आणि नाट्य सादरीकरणातून गुरुदेवांना अभिवादन करण्यात आले.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना आदरांजली वाहिली.

उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी आपल्या संदेशात रवींद्रनाथ टागोर यांचे योगदान साहित्यापुरते



मर्यादित नसल्याचे म्हटले. "ते एक दूरदर्शी विचारवंत, कलाकार आणि शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांच्या कार्यातून भारतीय संस्कृतीची समृद्धी आणि मानवतेची सार्वत्रिक मूल्ये प्रतिबिंबित होतात," असे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुदेवांचे वर्णन "असामान्य प्रतिभेचे लेखक, विचारवंत आणि कवी" असे केले. "रवींद्रनाथ टागोर यांनी तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कलाकार आणि भारताच्या सांस्कृतिक आत्म्याचा कालातीत आवाज म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या विचारांनी समाजाला नवी सृजनशील ऊर्जा आणि सांस्कृतिक आत्मविश्वास दिला," असे मोदी म्हणाले. "गुरुदेवांनी मानवता, संस्कृती आणि उदात्त मूल्यांना आपल्या साहित्याद्वारे अभिव्यक्त केले. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत," असेही पंतप्रधानांनी म्हटले आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी "एक भारत, श्रेष्ठ भारत" या संकल्पनेला बळकटी देण्यात गुरुदेवांचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. "ते उत्तुंग साहित्यिक, प्रगल्भ विचारवंत आणि संगीत क्षेत्रातील प्रतिभावंत होते. त्यांचे जीवन आणि तत्त्वज्ञान पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील," असे त्यांनी नमूद केले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही गुरुदेवांना अभिवादन करत "रवींद्रनाथ टागोर यांनी साहित्य, संगीत आणि तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून स्वातंत्र्याच्या भावनेला नवी दिशा दिली," असे म्हटले. "गीतांजलीने मानवता, अध्यात्म आणि संवेदनशीलतेला नवी उंची दिली, तर 'जन गण मन'ने राष्ट्रीय एकात्मता आणि स्वाभिमानाला स्वर दिला," असे शाह यांनी आपल्या संदेशात नमूद केले.

## अग्निमित्रा पॉल मंत्रिमंडळात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये प्रथमच भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले असून सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नव्या मंत्रिमंडळात प्रादेशिक प्रतिनिधित्व आणि अनुभव यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून आले.

आसनसोल दक्षिणच्या आमदार अग्निमित्रा पॉल यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले आहे. सुवेंदू अधिकारी आणि दिलीप घोष यांच्यानंतर त्यांनी तिसऱ्या क्रमांकावर पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली. त्यांच्याकडे महत्त्वाचे खाते सोपवले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

अग्निमित्रा पॉल यांनी २०२१ मध्ये आसनसोल दक्षिण मतदारसंघातून प्रथम विधानसभा निवडणूक जिंकून विधानसभेत प्रवेश केला होता. त्यांनी तृणमूल काँग्रेसच्या सयानी घोष यांचा पराभव केला होता. २०२६ च्या निवडणुकीतही त्यांनी विजय मिळवत तृणमूल काँग्रेसचे तापस बॅनर्जी यांना पराभूत केले. यापूर्वी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्या मेदिनीपूर मतदारसंघातून भाजपच्या उमेदवार होत्या, मात्र त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

राजकारणात येण्यापूर्वी अग्निमित्रा पॉल या फॅशन डिझायनर आणि उद्योजक म्हणून कार्यरत होत्या. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीमधून शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी स्वतःचा फॅशन ब्रँड उभा केला आणि कोलकात्याच्या फॅशन क्षेत्रात ओळख निर्माण केली. २०१९ मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि अल्पावधीतच पक्ष संघटनेत सक्रिय भूमिका निभावली.

दरम्यान, मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी सामूहिक नेतृत्वावर भर देत भ्रष्टाचाराविरोधात कठोर भूमिका घेण्याचे संकेत दिले. राज्यातील कथित संस्थात्मक भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.

संदेशखाली आणि आर. जी. कर मेडिकल कॉलेजसारख्या प्रकरणांमध्ये तातडीने कारवाई केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

## टीएमसीचा निवडणूक आयोगावर निशाणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर तृणमूल काँग्रेसने निवडणूक प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत निवडणूक आयोगावर पक्षपातीपणाचा आरोप केला आहे. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आणि खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी शनिवारी सोशल मीडियावरून प्रतिक्रिया देताना निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा दावा केला.

निकाल जाहीर झाल्यानंतरच्या आपल्या पहिल्याच प्रतिक्रियेत अभिषेक बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगासह विविध सरकारी संस्थांच्या भूमिकेवर टीका केली. "संपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान आम्हाला सरकारी यंत्रणा आणि भारतीय निवडणूक आयोगाकडून अत्यंत पक्षपाती वर्तनाचा अनुभव आला," असा आरोप त्यांनी केला. डायमंड हार्बरचे खासदार असलेल्या बॅनर्जी यांनी "लोकशाही संस्थांच्या निष्पक्षतेशी तडजोड झाली असून त्यामुळे पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता, पारदर्शकता आणि निष्पक्षतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत," असे म्हटले. तृणमूल काँग्रेसने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत निवडणूक लढवली असून सुमारे ३० लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

बॅनर्जी यांनी मतदानासाठी वापरण्यात आलेल्या ईव्हीएम आणि कंट्रोल युनिट्सच्या हालचालींमध्येही अनियमितता झाल्याचा आरोप केला. तृणमूल काँग्रेसने मतमोजणी केंद्रांमधील सीसीटीव्ही फुटेज सार्वजनिक करण्याची तसेच व्हीव्हीपॅट स्लिपची पारदर्शक मोजणी करण्याची मागणी केली आहे. "लोकशाही टिकून राहण्यासाठी निवडणूक संस्थांबद्दल नागरिकांमध्ये विश्वास असणे आवश्यक आहे.

## भाजपच्या विजयाने तृणमूलमध्ये खळबळ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयाने तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत असंतोष उफाळून आला असून पक्षाने आपल्या पाच नेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. पक्ष नेतृत्वावर सार्वजनिक टीका करणे आणि पक्षविरोधी भूमिका घेणे हे शिस्तभंगाचे कृत्य असल्याचे नमूद करत या नेत्यांकडून २४ तासांत स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे.

नोटीस मिळालेल्यांमध्ये पक्षाच्या प्रवक्त्या रिजू दत्ता, प्रवक्ते कोहिनूर मजुमदार, इंग्लिश बाजार नगरपालिकेचे अध्यक्ष कृष्णेंदु नारायण चौधरी, मालदाचे माजी अध्यक्ष कार्तिक कुंडू आणि दार्जिलिंगच्या माजी अध्यक्षा पापिया घोष यांचा समावेश आहे. "तुमची विधाने पक्षविरोधी असून नेतृत्वावर थेट टीका करणारी आहेत. यामुळे संघटनात्मक शिस्त बिघडते. तुमच्यावर कारवाई का करू नये, याचे स्पष्टीकरण द्यावे," असे नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

४ मे रोजी निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसमधील काही नेत्यांनी पक्षाचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यावर उघडपणे टीका करण्यास सुरुवात केली. ममता बॅनर्जी यांचे पुतणे असलेल्या अभिषेक यांच्यावर पराभवासाठी जबाबदार असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. तसेच, निवडणुकीदरम्यान पक्षाचे रणनीती सल्लागार म्हणून काम करणाऱ्या आय-पॅक या संस्थेलाही लक्ष्य करण्यात आले आहे. तिकीट वाटपात आय-पॅक आणि अभिषेक बॅनर्जी यांची भूमिका निर्णायक होती आणि त्यामुळेच पक्षाचा पराभव झाला, असा दावा नाराज नेत्यांकडून केला जात आहे.

दार्जिलिंगच्या माजी अध्यक्षा पापिया घोष यांनी आपण २४ तासांत उत्तर देणार असल्याचे सांगितले. "मी आय-पॅकवर टीका केली होती. ती संस्था म्हणजे तृणमूल काँग्रेस नाही. यापूर्वीही आम्हाला आय-पॅकबाबत अडचणी आल्या आहेत," असे त्या म्हणाल्या. इंग्लिश बाजार नगरपालिकेचे अध्यक्ष कृष्णेंदु नारायण चौधरी यांनीही आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे सांगितले. "माझे उत्तर तयार आहे. मी जे बोललो ते योग्यच आहे," असे त्यांनी म्हटले. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेने भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांच्या विजयाबद्दल अभिनंदनाचा ठरावही मंजूर केला आहे. भाजप आमदार अमलान भादुरी यांचेही अभिनंदन करण्यात आले.

दरम्यान, तृणमूल काँग्रेसमधील काही नेते अजूनही पक्षविरोधात उघडपणे बोलत आहेत.

## पंजाबचे मंत्री संजीव अरोरा ईडीच्या रडारवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** पंजाबचे ऊर्जा, उद्योग, गुंतवणूक प्रोत्साहन आणि स्थानिक स्वराज्य मंत्री संजीव अरोरा यांच्या अधिकृत निवासस्थानी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) छापा टाकल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. फेमा अर्थात परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या उल्लंघनप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असून अरोरा यांच्याशी संबंधित कंपन्यांची मालमत्ता तात्पुरती जप्त करण्यात आली आहे.

ईडीकडून मेसर्स हॅम्पटन स्काय रियल्टी लिमिटेड आणि संबंधित कंपन्यांविरोधात तपास सुरू आहे. तपासात १५७.१२ कोटी रुपयांच्या कथित बनावट निर्यातीचे प्रकरण समोर आल्याचे सांगितले जात आहे. अरोरा यांच्याशिवाय त्यांच्या कंपन्यांमार्फत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंग केल्याचे आरोप आहेत. ईडीच्या पथकाने पहाटे सुमारे पाचच्या सुमारास चंदीगडमधील सेक्टर-२ येथील अरोरा यांच्या अधिकृत निवासस्थानी छापा टाकला. शोधमोहिमेदरम्यान ईडीची अनेक वाहने निवासस्थानाबाहेर तैनात करण्यात आली होती. दिल्ली, गुरुग्राम आणि चंदीगड येथील एकूण पाच ठिकाणी छापेमारी करण्यात आली. तपासात दुबईहून भारतात बेकायदेशीर निधी हस्तांतरित केल्याचा तसेच १०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचे मोबाइल फोन व्यवहारांद्वारे आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याशिवाय दिल्लीतील कथित बनावट कंपन्यांच्या खोटी जीएसटी खरेदी बिले देऊन इनपुट टॅक्स क्रेडिटचा लाभ घेतल्याचाही आरोप आहे. निर्यात कर्जावरील जीएसटी परतावा आणि शुल्क ड्रॉबॅकमुळे सरकारी महसुलाचे नुकसान झाल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला आहे.

## सतीशन, वेणुगोपाल, चेन्निथला समर्थक रस्त्यावर

# मुख्यमंत्रीपदावरून शक्तिप्रदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोची :** केरळ विधानसभा निवडणुकीत यूडीएफला विजय मिळाल्यानंतर चार दिवस उलटूनही काँग्रेसकडून मुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय जाहीर न झाल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. व्ही. डी. सतीशन, के. सी. वेणुगोपाल आणि रमेश चेन्निथला यांच्या समर्थकांनी राज्यभरात शक्तिप्रदर्शन सुरू केले असून काँग्रेसमधील नेतृत्वाच्या स्पर्धेचे चित्र स्पष्टपणे समोर येत आहे.




कोझिकोड, तिरुवनंतपुरम, कोट्टायम आणि एर्नाकुलमसह विविध भागांत कार्यकर्त्यांनी मोर्चे, फलकबाजी आणि सोशल मीडियावर मोहिमा सुरू केल्या आहेत. आपल्या पसंतीच्या नेत्याला मुख्यमंत्रिपद द्यावे, अशी मागणी समर्थकांकडून करण्यात येत आहे. कोझिकोडमधील मुथलकुलम, कोयिलंडी, कुट्टियाडी आणि वडकारा येथे व्ही. डी. सतीशन यांच्या समर्थनार्थ मोठी निदर्शने करण्यात आली. अनेक ठिकाणी त्यांचे भव्य कटआउट्स लावण्यात आले असून त्यांना 'किंगमेकर' आणि 'बाहुबली' अशी बिरुदे देण्यात आली आहेत. मलप्पुरममध्ये "मथेथारा केरळम व्हीडी-कू ओप्पम" या घोषवाक्याखाली मोर्चे काढण्यात आले, तर पाम्पडी येथे "सेक्युलर केरळम विथ सतीसन" या नावाने रॅलीचे आयोजन करण्यात आले.

तिरुवनंतपुरममध्ये शहीद स्तंभापासून सचिवालयापर्यंत समर्थकांनी सतीशन यांच्या फलकांसह मोर्चा काढला. काही ठिकाणी के. सी. वेणुगोपाल यांची पोस्टर्स हटवून त्याजागी सतीशन यांचे बॅनर लावण्यात आल्याची माहिती आहे. एर्नाकुलम आणि कलमस्सेरी परिसरातही फ्लेक्सबाजीची स्पर्धा पाहायला मिळाली. इडुक्की जिल्हा काँग्रेस समितीने सतीशन समर्थकांच्या आंदोलनावर कठोर भूमिका घेत चार पदाधिकाऱ्यांना पदावरून हटवले. संबंधित पदाधिकाऱ्यांनी सतीशन यांना मुख्यमंत्री करण्याच्या मागणीसाठी मोर्चा काढल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, बूथ आणि मंडळ समित्यांमधील तळागाळातील अनेक पदाधिकारी उघडपणे आंदोलनात सहभागी झाले आहेत.

मुख्यमंत्री निवड ही जनदबावाऐवजी पक्षांतर्गत सहमतीने व्हावी, अशी भूमिका काँग्रेसमधील काही ज्येष्ठ नेत्यांनी घेतल्याचे सांगितले जात आहे. या गटातील अनेकांचा कल के. सी. वेणुगोपाल यांच्या बाजूने असल्याची चर्चा आहे. ही लढाई आता सोशल मीडियावरही पोहोचली आहे. राहुल गांधी यांनी केरळच्या मतदारांचे आभार मानणारी पोस्ट केल्यानंतर सतीशन समर्थकांनी त्यावर प्रतिक्रिया देत वेणुगोपाल यांची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती करू नये, अशी मागणी केली.

# विजय यांचा सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** अभिनेते विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघमला (टीव्हीके) विदुथलाई चिरुथैगल काची (व्हीसीके) शनिवारी पाठिंबा जाहीर करण्याची शक्यता असून, त्यामुळे तामिळनाडूमध्ये सरकार स्थापनेसाठी आवश्यक बहुमताचा मार्ग मोकळा होण्याची चिन्हे आहेत. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय अनिश्चिततेवर यामुळे पडदा पडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकून टीव्हीके सर्वात मोठा पक्ष ठरला असला, तरी राज्यपालांनी अद्याप सरकार स्थापनेची परवानगी दिलेली नाही. बहुमत सिद्ध करण्यासाठी आवश्यक पाठिंबा दाखवण्याची अट राज्यपालांनी घातली आहे. निकाल जाहीर झाल्यापासून विजय यांनी तीन वेळा राज्यपालांची भेट घेतली आहे.

द्रमुक आघाडीचा भाग म्हणून निवडणूक लढलेल्या काँग्रेसने आधीच टीव्हीकेला पाठिंबा दिला आहे. गुरुवारी डाव्या पक्षांनीही विजय यांच्या नेतृत्वाला समर्थन जाहीर केले. त्यामुळे सरकार स्थापनेची शक्यता अधिक बळकट झाली, मात्र बहुमतासाठी आवश्यक आकड्यापासून पक्ष एक जागा दूर राहिला. डाव्या पक्षांचे निकटवर्तीय सहकारी असलेल्या व्हीसीकेनेही विजय यांना पाठिंबा देण्याचे संकेत दिले होते. मात्र, अधिकृत समर्थनपत्र न दिल्याने शनिवारी होणारा संभाव्य शपथविधी सोहळा पुढे ढकलण्यात आल्याचे समजते. व्हीसीकेचे प्रमुख थोल थिरुमावलवन यांनी यापूर्वीच आपल्या पक्षाचा निर्णय डाव्या पक्षांच्या भूमिकेशी सुसंगत असेल, असे स्पष्ट केले होते. पक्षाचे वरिष्ठ नेते वन्नियारासू यांनीही व्हीसीके सत्तेत सहभाग घेण्यास इच्छुक असल्याचे संकेत दिले आहेत. "कोणी आम्हाला दुर्लक्षित करण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही राज्यातील मध्यवर्ती राजकीय शक्ती म्हणून उदयास येऊ," असे त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

विजय यांनी शुक्रवारी डाव्या पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली असून सरकार स्थापनेच्या पार्श्वभूमीवर ते लवकरच थोल थिरुमावलवन यांची भेट घेण्याची शक्यता आहे. अशोक नगर येथील व्हीसीकेच्या कार्यालयाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

## मनरेगा योजनेवरून मोदींवर टीका

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार 'मनरेगा' रद्द करून 'कामाचा अधिकार' संपुष्टात आणत आहे, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केली. खर्गे यांनी केंद्र सरकारवर गरिबांसाठी काम करण्याचा अधिकार काढून टाकण्याची पूर्वयोजना आखल्याचा आरोप केला. 'मनरेगा'ची हत्या करण्यापूर्वी मोदी सरकारने कामाच्या अधिकाराचा गळा आवळून कोट्यवधी गरिबांवर अत्याचार केले होते, असा आरोप त्यांनी केला आहे.

## राहुल गांधींचा भाजपवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बिहारमधील वाढत्या बेरोजगारीच्या मुद्द्यावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली आहे. पाटणा येथे आंदोलन करणाऱ्या शिक्षक भरती इच्छुकांवर पोलिसांनी केलेल्या कथित लाठीमाराचाही त्यांनी निषेध केला.

राहुल गांधी यांनी शनिवारी सोशल मीडियावर पोस्ट करत बिहार पोलिसांनी शांततेत आंदोलन करणाऱ्या उमेदवारांवर बळाचा वापर केल्याचा आरोप केला. "पाटणा येथे नोकरीच्या हक्कासाठी शांततेने आंदोलन करणाऱ्या शिक्षक इच्छुकांना बिहार पोलिसांनी पुन्हा बेदम मारहाण केली. बेरोजगार तरुणांना भाजपचा प्रतिसाद म्हणजे लाठ्या," असा आरोप



त्यांनी केला.

देशातील बेरोजगारी ही सध्या सर्वात मोठी समस्या असल्याचे सांगताना राहुल गांधी म्हणाले की, "या संकटाचा सर्वाधिक फटका बिहार आणि उत्तर प्रदेशातील तरुणांना बसत आहे. लाखो युवक हातात पदवी आणि कौशल्य घेऊन नोकरीसाठी भटकत आहेत. मात्र भाजप सरकारला त्यांच्या समस्या आणि भविष्याची चिंता नाही." तरुण रोजगारासाठी रस्त्यावर उतरले की त्यांना नोकरी देण्याऐवजी लाठीमाराचा सामना करावा लागत असल्याची टीकाही त्यांनी केली.

## मंच सजावट, घोषणाबाजी प्रत्येक स्तरावर हिंदुत्वाचे प्रतीकात्मक दर्शन

# शपथविधीतून हिंदुत्वाचा भाजपचा स्पष्ट संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये प्रथमच भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर झालेल्या शपथविधी सोहळ्यात भाजपने आपल्या हिंदुत्ववादी विचारसरणीचा ठळक राजकीय संदेश दिल्याची चर्चा रंगली आहे. मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी यांच्या शपथविधीपासून मंच सजावटीपर्यंत आणि नेत्यांच्या उपस्थितीपासून घोषणाबाजीपर्यंत प्रत्येक स्तरावर हिंदुत्वाचे प्रतीकात्मक दर्शन घडवल्याचे चित्र दिसून आले.

कोलकात्यातील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राउंडवर शनिवारी



झालेल्या भव्य शपथविधी सोहळ्यात राज्यपाल आर. एन. रवी यांनी सुवेंदू अधिकारी यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री, भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, एनडीएचे वरिष्ठ नेते आणि हजारो भाजप समर्थक उपस्थित होते. शपथविधीपूर्वी सुवेंदू अधिकारी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत खुल्या जीपमधून कार्यक्रमस्थळी दाखल झाले. भगव्या रंगाचा कुर्ता परिधान केलेल्या सुवेंदू अधिकारी यांच्या स्वागतासाठी उपस्थित कार्यकर्त्यांनी 'जय श्रीराम'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. संपूर्ण कार्यक्रमस्थळी भगवे झेंडे आणि बॅनर झळकत होते.

व्यासपीठावर पोहोचल्यानंतर नरेंद्र मोदी, सुवेंदू अधिकारी आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष यांनी सर्वप्रथम रवींद्रनाथ टागोर यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मात्र, मंचाच्या पार्श्वभूमीवर देवी दुर्गेचे मोठे चित्र लावण्यात आल्याने बंगालच्या सांस्कृतिक ओळखीला हिंदुत्वाच्या प्रतीकांशी जोडण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात आल्याचे मानले जात आहे.

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुवेंदू अधिकारी यांनी व्यासपीठावरील सर्व एनडीए नेत्यांचे अभिवादन केले. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सुवेंदू अधिकारी यांना भगवा स्कार्फ परिधान करून शुभेच्छा दिल्या. त्यानंतर पुन्हा एकदा 'जय श्रीराम'च्या घोषणांनी संपूर्ण मैदान दुमदुमून गेले. भाजप आपल्या मूलभूत विचारसरणीपासून मागे हटणार नसल्याचा हा प्रतीकात्मक संदेश असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपने हिंदुत्वाचा मुद्दा आक्रमकपणे मांडला होता. रामनवमी, दुर्गापूजा, धार्मिक ध्रुवीकरण आणि बंगालच्या सांस्कृतिक अस्मितेचा मुद्दा निवडणूक प्रचारात सातत्याने पुढे आणण्यात आला होता. त्याचाच विस्तार शपथविधी सोहळ्यातही दिसून आल्याचे निरीक्षकांचे मत आहे.

दरम्यान, दिलीप घोष, अग्निमित्रा पॉल, खुदीराम टुडू, अशोक कीर्तनिया आणि माजी केंद्रीय मंत्री निशीथ प्रामाणिक यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली. भाजपच्या विजयामुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठा बदल घडल्याचे मानले जात असून, शपथविधी सोहळ्यातून पक्षाने राजकीय आणि वैचारिक दोन्ही स्तरांवर आपली भूमिका स्पष्ट केल्याचे दिसून आले.